# स्नातकोत्तर पशुवैद्यक व पशुविज्ञान संस्था

**मूर्तीजापूर रोड, कृषिनगर, अकोला-४४४१०४**

जा. क्र. सह. अधि./ स्नापपविसं / 1563 /२०२६ दिनांक : 03/09 /२०२६

**दरपत्रक मागविण्याची सूचना**

**विषय: सुरक्षा विभागा अंतर्गत विविध विभाग, मुलींचे वस्तीगृह व सुरक्षा विभागातील दैनदिन व इतर कामे करण्यासाठी कंत्राटी पद्धतीने निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात मजूर पुरविण्याकरीता सीलबंद दरपत्रक मागविणेबाबत......**

पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, अकोला अंतर्गत सुरक्षा विभाग, विविध विभाग आणि पशुवैद्यकीय दवाखाना संकुल या ठिकाणी सुरक्षा, नियमित स्वच्छता आणि इतर दैनंदिन कामे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात दैनंदिन पद्धतीने करण्यासाठी कंत्राटी सेवा उपलब्ध करवून घेण्याचे प्रस्तावित आहे.

**कामाचा तपशील पुढीलप्रमाणे आहे:**

सुरक्षा विभाग, विविध विभाग, मुलींचे वसतीगृह, पशुवैद्यकीय दवाखाना संकुल व महाविद्यालय परीसरातील चौकीदारी, सुरक्षा, साफसफाई, परीसरातील गवत काढणे, इत्यादी.

**अटी व शर्ती:**

- कंत्राट हे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात असून कंत्राट रद्द करण्याचे तसेच आवश्यकतेनुसार त्यास मुदतवाढ देण्याचे संपूर्ण अधिकार मा. सहयोगी अधिष्ठाता, पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, अकोला यांना राहतील.
- मजुरी दर प्रती दिन प्रमाणे नमूद करावे. तसेच नमूद दर, कंत्राट मिळाल्यापासून कमीत कमी पुढील एक वर्ष पर्यंत वैध असावेत.
- कंत्राटदाराकडे कामगार कार्यालयाचे कामगार नोंदणी प्रमाणपत्र, स्वतःचे बँक खाते व प्यान कार्ड असणे आवश्यक आहे.
- दरपत्रक/ दरपत्रके स्वीकारण्याचे अथवा नाकारण्याचे पूर्ण अधिकार मा. सहयोगी अधिष्ठाता, पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, अकोला यांना राहतील.
- कामाच्या ठिकाणी पुरविण्यात येणाऱ्या सेवा देतांना सेवा कंत्राटदाराने नेमलेल्या मनुष्यबळ, त्यांची मजुरी, त्यांच्या जीविताची, पी.एफ., विमा, सुरक्षा, सेवा देत असतांना महाविद्यालयातील कोणत्याही चाल किंवा अचल संपत्तीचे नुकसान झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी सेवा कंत्राटदाराची असेल.
- महाराष्ट्र शासन आणि महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर ने वेळोवेळी निर्गमित केलेल्या कायदे, नियम, परिनियम, परिपत्रके, अधिसूचना, शारण निर्णय, नियमावली इत्यादींच्या अधीन राहून सेवा पुरविण्याची संपूर्ण जबाबदारी सेवा कंत्राटदाराची असेल.
- कंत्राटदारास काम सोडून जायचे असल्यास किमान एक महिना आधी पूर्व सूचना देणे बंधनकारक आहे. अन्यथा त्यांचेकडून एक महिन्याच्या सेवा कंत्राट रकमेची वसुली करण्यात येईल.
- सदरील कंत्राट पूर्वसूचना देऊन रद्द करण्याचे सर्वाधिकार मा. सहयोगी अधिष्ठाता, स्नातकोत्तर पशुवैद्यक व पशुविज्ञान संस्था, अकोला यांना राहतील.
- दरपत्रकावर तसेच सदर दरपत्रक ज्या लिफाफ्यात सीलबंद केले आहे त्या लिफाफ्यावर ठळक अक्षरांत '**दरपत्रक – दैनंदिन मजूर कंत्राट - सुरक्षा विभाग**' असे लिहावे.
- दरपत्रकावर तसेच सदर दरपत्रक ज्या लिफाफ्यात सीलबंद केले आहे त्या लिफाफ्यावर या दरपत्रक मागविण्याच्या सूचनेचा क्रमांक संदर्भ क्रमांक म्हणून लिहावा.
- सीलबंद दरपत्रके **सहयोगी अधिष्ठाता, पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, कृषिनगर, अकोला-४४४१०४** या पत्यावर दिनांक ०९/०९/२०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत पोहोचतील अशा बेताने पाठवावेत.

स्वा.<br>**सहयोगी अधिष्ठाता**<br>पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय<br>अकोला-४४४१०४

**प्रत:**

- सूचना फलक – पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, अकोला / पशुधन प्रक्षेत्र, स्नापपविसं, अकोला
- प्रभारी, इंट्रानेट कक्ष, पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, अकोला यांनी सदर सूचना विस्तृत प्रसिद्धीसाठी महाविद्यालयाच्या संकेत स्थळावर तात्काळ प्रकाशित करावी, ही विनंती.